**आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्, नागपूर**

**फोन नं : 0712- 2551550/2551541 ई मेल-commissionermgnregsmah@gmail.com**

पत्र क्रमांक : आयुक्तालय/पंचायत/१२३०/2015 दिनांक 8 / 7 /2015

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

विषय : इंदिरा आवास योजने अंतर्गत बाधण्यात येणा-या घरकुलाच्या कामातील अकुशल कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्याबाबत अतिरिक्त सूचना

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक मग्रारो-2014/प्र.क्र./प्र.क्र.64 अ/रोहयो-10अ दि 30/5/2015

इंदिरा आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणा-या घरकुलाच्या कामामध्ये अकुशल कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्याबाबतच्या सूचना संदर्भिय शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. क्षेत्रिय स्तरावर प्रत्यक्ष कामे करतांना हजेरीपत्रक काढणे, मोजमापे नोंदविणे, मजूरीची अदायगी या संदर्भात करावयाच्या कार्यपध्दतीबाबत अतिरिक्त सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1) मगांराग्रारोहयो अंतर्गत लाभार्थी कुटुंबाला अदा करण्यात येणारी मजूरीची रक्कम, इंदिरा आवास योजनेच्या एकूण निश्चित रकमे (रु 95000/-) व्यतिरिक्त (over and above) दिली जाणार आहे. [Wage employment by the beneficiaries can be paid under MGNREGA over and above the unit cost fixed for IAY].

2) सदर योजने अंतर्गत कामांना गट विकास अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता देतांना प्रशासकीय मान्यता आदेशात जॉब कार्ड क्रमांक नमूद करावा.

3) केंद्र शासनाने 20 Sq. Mtr. प्रमाणे बांधकाम गृहीत धरून सर्वसाधारण भागात 90 मनुष्य दिवस व डोंगराळ क्षेत्र आणि IAP जिल्हयात 95 मनुष्य दिवस मजूरी अदा करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच मजूरी अदा करण्याचे टप्पे देखील निश्चित करण्यात आलेले आहेत. प्रत्येक जिल्हयाने जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन एक नमूना अंदाजपत्रक तयार करावे व अंदाजपत्रकात टप्पानिहाय अपेक्षित मनुष्य दिवसाप्रमाणे मगांराग्रारोहयो मधून मजूरीची रक्कम अदा करावी. मात्र, सदर रक्कम सर्वसाधारण भागात 90 मनुष्य दिवस व डोंगराळ क्षेत्रात आणि IAP जिल्हयात 95 मनुष्य दिवसांपेक्षा जास्त असू नये. आपले सुलभ संदर्भासाठी भंडारा जिल्हयाने तयार केलेले नमुना अंदाजपत्रक सोबत संलग्न आहे.

4) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना (जून 2014) मध्ये मुद्दा क्र 6 (vii) नुसार प्रत्येक टप्प्याला समाधानकारक पुर्णत्वानंतर तांत्रिक अधिकारी तसे प्रमाणपत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र अ ते ड मध्ये दिलेल्या नमुन्यात MB मध्ये नोंदवतील. झालेले काम व खर्ची पडलेले मनुष्य दिवस नुसार मजूरीची रक्कम मगांराग्रारोहयोच्या विहीत कार्यपध्दती प्रमाणे अदा करावी.

5) इंदिरा आवास योजनेच्या बांधकामाची सुरुवात करतांना लाभार्थ्याला कामासाठी लाईन आऊट देतांना पहिले हजेरीपत्रक उपलब्ध करुन द्यावे.

6) जे व्यक्ति कामावर असणार आहेत त्यांचे आधार क्रमांक (उपलब्ध असल्यास) किंवा खाते क्रमांक प्राप्त करुन घ्यावेत. संबंधितांकडे आधार क्रमांक किंवा खाते क्रमांक नसल्यास त्यांना कामापासून वंचित ठेवू नये. भुगतानापुर्वी संबंधित मजूराने खाते उघडणे अपेक्षित राहील.

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर इंदिरा आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणा-या घरकुलाच्या कामामध्ये अकुशल कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत करण्याबाबतच्या सूचना आपले स्तरावरुन निर्गमित कराव्यात ही विनंती.

आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार
हमी योजना, महाराष्ट्र, नागपूर

प्रतिलिपी : (1) मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
(2) मा. सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
(3) मा. विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.
(4) जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.

आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार
हमी योजना, महाराष्ट्र, नागपूर

**प्रपत्र - अ**

**इदिरा आवास योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत घरकुल बांधकाम**

**आर्थिक वर्ष : 2015-16** **ग्रामपंचायत :**

लाभार्थ्याचे नांव : जॉब कार्ड क्र. :

तांत्रिक मंजूरी आदेश क्र.

इंदिरा आवास योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

**टप्पा पहिला : पायवा खोदकाम ते जोता लेव्हल बांधकाम**

हजेरीपत्रक क्र : हजेरीपत्रकाचा कालावधी :

निर्मित मनुष्य दिवस : अदा करावयाची मजूरी :

पहिला टप्पा पुर्ण झाल्याचा प्रमाणित फोटो

"प्रमाणित करण्यात येते की श्री/श्रीमती ------------------------------------------- यांचे घरकुल बांधकाम जोता लेव्हल पर्यंत पुर्ण झाले असून सदर कामावर ---------------------- मनुष्य दिवस निर्माण झाले आहेत. मजूराला रु -------------- मजूरी त्यांचे खातेवर अदा करण्याची शिफारीस करण्यात येत आहे."

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| ग्रामरोजगार सेवक | ग्रामसेवक | शाखा अभिंयता/कनिष्ठ अभियंता |

**<u>प्रपत्र - ब</u>**

**<u>इदिरा आवास योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत घरकुल बांधकाम</u>**

**<u>आर्थिक वर्ष : 2015-16</u>** **<u>ग्रामपंचायत :</u>**

लाभार्थ्याचे नांव : जॉब कार्ड क्र. :

तांत्रिक मंजूरी आदेश क्र.

इंदिरा आवास योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

**<u>टप्पा दुसरा : जोता लेव्हल ते सज्जा लेव्हल पर्यंत बांधकाम :</u>**

हजेरीपत्रक क्र : हजेरीपत्रकाचा कालावधी :

निर्मित मनुष्य दिवस : अदा करावयाची मजूरी :

दुसरा टप्पा पुर्ण झाल्याचा प्रमाणित फोटो

"प्रमाणित करण्यात येते की श्री/श्रीमती ------------------------------------------------ यांचे घरकुल बांधकाम जोता लेव्हल ते सज्जा लेव्हल पर्यंत पुर्ण झाले असून सदर कामावर ---------------------- मनुष्य दिवस निर्माण झाले आहेत. मजूराला रु -------------- मजूरी त्यांचे खातेवर अदा करण्याची शिफारीस करण्यात येत आहे."

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|
| ग्रामरोजगार सेवक | ग्रामसेवक | शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता |

**प्रपत्र - क**

**इदिरा आवास योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत घरकुल बांधकाम**

**आर्थिक वर्ष : 2015-16** **ग्रामपंचायत :**

लाभार्थ्याचे नांव : जॉब कार्ड क्र. :

तांत्रिक मंजूरी आदेश क्र.

इंदिरा आवास योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

**टप्पा तिसरा : सज्जा लेव्हल ते स्लॅब लेव्हल पर्यंत बांधकाम :**

हजेरीपत्रक क्र : हजेरीपत्रकाचा कालावधी :

निर्मित मनुष्य दिवस : अदा करावयाची मजूरी:

तिसरा टप्पा पुर्ण झाल्याचा प्रमाणित फोटो

"प्रमाणित करण्यात येते की श्री/श्रीमती ------------------------------------------ याचे घरकुल बांधकाम स्लॅब लेव्हल पर्यंत पुर्ण झाले असून सदर कामावर -------------------- मनुष्य दिवस निर्माण झाले आहेत. मजूराला रु -------------- मजूरी त्यांचे खातेवर अदा करण्याची शिफारीस करण्यात येत आहे."

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| ग्रामरोजगार सेवक | ग्रामसेवक | शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता |

**प्रपत्र - ड**

**इंदिरा आवास योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत घरकुल बांधकाम**

**आर्थिक वर्ष : 2015-16** **ग्रामपंचायत :**

लाभार्थ्याचे नांव : जॉब कार्ड क्र. :

तांत्रिक मंजूरी आदेश क्र.

इंदिरा आवास योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रशासकीय मंजूरी आदेश क्र :

**टप्पा चवथा : स्लॅब बांधकाम ते घरकुलाचे संपूर्ण बांधकाम :**

हजेरीपत्रक क्र : हजेरीपत्रकाचा कालावधी :

हजेरीपत्रक मनुष्य दिवस : अदा करावयाची मजूरी :

चवथा टप्पा पुर्ण झाल्याचा प्रमाणित फोटो

"प्रमाणित करण्यात येते की श्री/श्रीमती ------------------------------------------ याचे घरकुलाचे स्लॅब बांधकाम ते घरकुलाचे संपूर्ण बांधकाम पुर्ण करुन झाले असून सदर कामावर -------------------- मनुष्य दिवस निर्माण झाले आहेत. मजूराला रु -------------- मजूरी त्यांचे खातेवर अदा करण्याची शिफारीस करण्यात येत आहे."

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| ग्रामरोजगार सेवक | ग्रामसेवक | शाखा अभिंयता/कनिष्ठ अभियंता |